# मुंबई विद्यापीठ
# University of Mumbai

Reaccredited by NAAC
with 'A' Grade

## अर्थसंकल्पीय अंदाज २०१३-२०१४

## BUDGET FOR THE YEAR 2013-2014

प्राचार्य डॉ. राजपाल श्री. हांडे यांनी विद्यापीठाच्या वार्षिक अधिसभेत,
गुरूवार, दिनांक २१ मार्च, २०१३ रोजी सादर केलेले
अर्थसंकल्पावरील भाषण

**Speech of Principal Dr. Rajpal S. Hande**
**at the Annual Meeting of the Senate,**
**on**
**Thursday, 21st March, 2013.**

# मुंबई विद्यापीठ

## अर्थसंकल्पीय अंदाज २०१३ - २०१४

प्राचार्य डॉ. राजपाल श्री. हांडे यांनी विद्यापीठाच्या वार्षिक अधिसभेत,

गुरूवार, दिनांक २१ मार्च, २०१३ रोजी सादर केलेल्या

अर्थसंकल्पावरील भाषण

**प्राचार्य डॉ. राजपाल श्री. हांडे, संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांनी विद्यापीठाच्या २०१३-२०१४ वर्षाच्या अर्थसंकल्पावर अधिसभेच्या वार्षिक सभेत केलेले भाषण**

सन्माननीय कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव आणि अधिसभेचे सन्माननीय सदस्य,

व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मुंबई विद्यापीठाचा वर्ष २०१३-२०१४ चा अर्थसंकल्पीय अंदाज आणि आर्थिक स्थितीचे विवरणपत्र आपणासमोर सादर करण्यास मला आनंद होत आहे. आपल्यासमोर विद्यापीठाचा अर्थसंकल्प सादर करण्याची संधी मला दिल्याबद्दल मी मा. कुलगुरू, व्यवस्थापन परिषद आणि वित्त व लेखा समिती यांच्या प्रती कृतज्ञ आहे.

विद्यापीठातील विविध विभाग, संस्था व कक्ष यांच्या योजना, कार्यक्रम व आवश्यकता विचारात घेऊन अंदाजपत्रक तपासणी समितीने अंदाजपत्रक वास्तव स्वरूपात तयार करण्याचा प्रयत्न केला आहे.

१९९४ च्या विद्यापीठ कायदयान्वये प्रस्तुत अर्थसंकल्पीय अंदाज तीन स्वतंत्र भागांमध्ये सादर करण्यात आला आहे. हे भाग पुढील प्रमाणे: भाग १ व २ - देखभाल आणि विकास आणि भाग ३ - स्वतंत्र प्रकल्प किंवा योजना किंवा सहयोगी उपक्रमासाठी अनुदान. केंद्रशासन /राज्य शासन/ विद्यापीठ अनुदान मंडळ आणि अन्य संस्था यांनी मान्यता दिलेल्या आणि आर्थिक सहाय्य केलेल्या योजनांचा सारांश त्या त्या विभागांतर्गत दाखवला आहे.

प्रस्तुत प्रस्ताव दोन भागात आहे. विद्यापीठ कामकाजाच्या सर्वसाधारण चर्चेसाठी प्रस्तावाचा भाग - १, मी प्रथम सादर करीत आहे. त्यामुळे अधिसभेच्या सर्व सदस्यांना विद्यापीठाच्या आर्थिक बाबी, प्रशासकीय बाबी आणि अन्य उपक्रम या संबंधी चर्चा करता येणे शक्य होईल.

त्यानंतर दुरूस्ती प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी मी प्रस्तावाच्या दुस-या भागाकडे वळेन.

अधिसभा वर्ष २०१३-२०१४ चा अंदाजित अर्थसंकल्प विचारात घेऊन त्यावर विचारविनिमय करून तो संमत करील.

व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशीनुसार भाग एकचा प्रस्ताव मी आपल्यासमोर सादर करीत आहे.

"महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ कलम २८(ङ)" ला अनुसरून व्यवस्थापन परिषदेने सादर केलेल्या वार्षिक वित्तीय विवरणपत्राचा (ज्यामध्ये २०१३-२०१४ वर्षाचा अर्थसंकल्पीय अंदाज तसेच २०१२-२०१३ सालासाठी सुधारीत अंदाज यांचा समावेश आहे) विचार अधिसभेने करावा.

आपल्या विद्यापीठाच्या वैशिष्ठ्यपूर्ण अशा वित्तीय, प्रशासकीय, शैक्षणिक आणि अन्य बाबी आपल्यासमोर ठळकपणे मांडणे रास्त ठरेल, असे मला वाटते.

## वाढ आणि विकास :

परिशिष्ट २ मध्ये विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांची संख्या नमूद करण्यात आली आहे. २००३-२००४ साली संख्येने ३६९ असणारी महाविद्यालये वर्ष २०१२-२०१३ मध्ये ६९१ इतकी झाली आहेत. ही वाढ एकूण ८७.२६ टक्के झाली आहे. विद्यापीठाची अधिमान्यता असणा-या संस्थाची संख्या १०७ असून विद्यापीठामध्ये एकूण ५६ पदव्युत्तर विभाग आहेत, त्यामध्ये संस्था व अभ्यास केंद्रे यांचाही समावेश आहे.

विद्यार्थ्यांच्या संख्येतही लक्षणीय वाढ झाली आहे. वर्ष २००३-२००४ मध्ये विद्यार्थ्यांची संख्या ३,८३,२२४ इतकी होती, ही विद्यार्थी संख्या वाढून वर्ष २०१२-२०१३ मध्ये ही ६,६९,१३९ इतकी झालेली आहे. याचा अर्थ गेल्या दहा वर्षात विद्यार्थ्यांच्या संख्येत ७४.६१ टक्के इतकी वाढ झालेली आहे.

आपल्या माहितीस्तव तसेच अवलोकनार्थ या आधीच वितरीत केलेल्या वर्ष २०१३-२०१४ चे जोडपत्र २ व ३ या पुस्तिकेकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. या पुस्तिकेत विद्यापीठाच्या आर्थिक बाबीबद्दल माहिती दिलेली आहे.

## बांधकाम आणि विकास

विद्यापीठाच्या विविध संकुलामध्ये चालू असलेली बांधकामे खालील प्रमाणे आहेत:

| | | |
|---|---|---|
| १. | सिंथेटीक एथेलेटीक ट्रकचे बांधकाम. | १,००,०००/- |
| २. | अपारंपारिक उर्जा प्रकल्प. | २,००,००,०००/- |
| ३. | दोन प्रवेश द्वाराचे बांधकाम. | ७०,००,०००/- |
| ४. | सांस्कृतिक केंद्राचे बांधकाम. | ८०,००,०००/- |
| ५. | बॅकबे रेक्लेमेशन येथील मुलींच्या वसतिगृहाच्या तिस-या ते सातव्या मजल्याचे बांधकाम. | १,००,००,०००/- |
| ६. | विद्यापीठाच्या विविध इमारतीचे सौंदर्यीकरण. | १,००,०००/- |
| ७. | मराठी भाषा भवनाच्या पहिल्या मजल्याचे बांधकाम. | ५०,००,०००/- |

वरील सर्व कामे येत्या आर्थिक वर्षात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट घेण्यात आलेले आहे.

२०१३-२०१४ या वर्षामध्ये नियोजित बांधकामे खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | नविन परिक्षा भवनचे बांधकाम. | २,७५,००,०००/- |
| २. | नविन ग्रंथालयाचे बांधकाम. | ५०,००,०००/- |
| ३. | विद्यानगरी येथील संरक्षण भिंतीचे बांधकाम. | १,००,००,०००/- |
| ४. | तलावाचे बांधकाम. | १०,००,०००/- |
| ५. | जमिनीखालील पाण्याच्या टाकीचे बांधकाम. | ४५,००,०००/- |
| ६. | नविन अतिथीगृहाचे बांधकाम. | १०,००,०००/- |
| ७. | आंतरराष्ट्रीय विद्यार्थी वसतिगृहाचे बांधकाम. | १०,००,०००/- |
| ८. | मुलीच्या वसतिगृहाचे बांधकाम. | १०,००,०००/- |
| ९. | विद्यानगरी येथील विविध इमारतीचे सौंदर्यीकरण. | १,००,०००/- |
| १०. | क्रिडा संकुलाचे बांधकाम. | २,००,००,०००/- |
| ११. | राजीव गांधी केंद्राच्या दुस-या टप्प्याचे बांधकाम. | २,००,००,०००/- |
| १२. | आंतरराष्ट्रीय सांकेतिक केंद्राचे बांधकाम. | १,००,००,०००/- |
| १३. | जवाहरलाल नेहरू ग्रंथालयाची दुरूस्ती. | १,००,००,०००/- |
| १४. | वसतिगृहांची दुरूस्ती. | ९५,००,०००/- |

## आर्थिक स्थिती :

आता आपण वर्ष २०१३-२०१४ ची आर्थिक स्थिती आणि अंदाजपत्रकीय तरतुदी यांच्याकडे वळू या.

२०११ - २०१२ सालात रु.४,०११.४८ लाखांची तूट येईल असा अंदाज होता. परंतु प्रत्यक्षात मात्र रु.५२६.७१ लाख अधिशेष आहे.

२०१२-२०१३ या वर्षी रु.५,२६४.२६ लाख तुटीचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला होता. तथापि हया वर्षाच्या सुधारित अंदाजपत्रकात रु.४५८.२५ लाख एवढी तूट अपेक्षित आहे.

## आर्थिक वर्ष २०१२-२०१३ साठी मिळालेली देणगी

| क्र. | निधी देणा-याचे नाव | प्राप्त रक्कम (रु.) | प्रयोजन |
|---|---|---|---|
| १. | टाटा कंस्लटन्सी सर्व्हीसेस लिमिटेड | ८४,००,०००/- | राजाबाई टॉवर आणि ग्रंथालय बिल्डिंग फोर्ट येथील संवर्धन कामे करण्याकरीता देणगी |
| २. | श्री. रायचंद हंसराज धरमश्री चारीटेबल ट्रस्ट | ११,००,०००/- | तत्वज्ञान विभागातील जैन अकॅडमी शैक्षणिक संशोधन केंद्राकरीता अतिरिक्त देणगी |
| | एकूण | ९५,००,०००/- | |

विद्यापीठाच्या प्रकल्पांना सहृदयतेने व उदारपणे देणगी देणा-या सर्व दात्यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो व त्यांचेप्रती कृतज्ञता व्यक्त करतो. तसेच हया देणग्या मिळवण्यासाठी ज्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले त्या सर्व शुभचिंतकांचे ही आभार मानतो.

## २०१३ - २०१४ अर्थसंकल्पीय अंदाज

आवर्ती खात्यात १,२९३.६१ लाख रुपयांचा अधिशेष आणि अनावर्ती खात्यात ५,०१३.६३ लाख रुपयांची तूट असल्यामुळे वर्ष २०१३-२०१४ ची निव्वळ तूट ३,७२०.०२ लाख रुपये एवढी आहे.

**आवर्ती खात्याची स्थिती पुढीलप्रमाणे आहे:**

| | |
|---|---|
| एकूण आवर्ती उत्पन्न | रु.२७,५१९.४२ लाख |
| एकूण आवर्ती खर्च | रु.२६,२२५.८१ लाख |
| आवर्ती खात्यातील एकूण आधिक्य | रु. १,२९३.६१ लाख |

**अनावर्ती खात्याची स्थिती पुढीलप्रमाणे आहे:**

अनावर्ती खात्यात जमीन आणि इमारत यासाठी रुपये ४,४४२.५८ लाख, सयंत्र व यंत्रसामुग्री रुपये ५६.०१ लाख, साधनसामुग्री व फर्निचर इत्यादींसाठी रुपये १,६६८.८० लाख, अन्य खर्चासाठी रुपये ६६.०८ लाख आणि पुस्तकांसाठी रुपये २०९.६७ लाख इतकी तरतूद करण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| एकूण अनावर्ती उत्पन्न | रु.१,४२९.५१ लाख |
| एकूण अनावर्ती खर्च | रु.६,४४३.१४ लाख |
| अनावर्ती खात्यातील एकूण तूट | रु.५,०१३.६३ लाख |

मी आता या महनीय सभागृहाच्या सदस्यांना अशी विनंती करतो की त्यांनी पुस्तिकेतील परिशिष्ट दोन पहावे. प्रपत्र 'ड' मध्ये महसुली जमा व खर्च आणि प्रपत्र 'इ' मध्ये एकूण तूट, निव्वळ तूट व संपूर्ण तूट यांचा तपशीलवार ताळेबंद दिलेला आहे.

मी आता, अर्थसंकल्पीय वर्ष २०१३-२०१४ चे अंदाजपत्रकात समाविष्ट असलेल्या नवीन योजना/उपक्रम व त्याकरीता केलेली तरतूद याची माहिती खालील प्रमाणे नमूद करीत आहे -

| अ. क्र. | अर्थसंकल्पीय अंदाज २०१३-२०१४ | रूपये |
|---|---|---|
| १. | विद्यापीठातील या वर्षाचे उत्कृष्ट विद्यार्थी आणि विद्यार्थीनीं पारितोषिक | १,००,००० |
| २. | महाविद्यालयांना आंतरराष्ट्रीय शिबिरे/ परिषदांसाठी वित्तिय सहाय्य | २५,००,००० |
| ३. | एनलायटन युवरसेल्फ एव्हरी सॅटर्डे (आईज) | ५,००,००० |
| ४. | श्रेष्ठत्व शाश्वत विकास केंद्र | ५,००,००० |
| ५. | कन्फूसिअस संस्था | ५,००,००० |
| ६. | विद्यापीठ युवा धोरण | ५,००,००० |
| ७. | मुलींना स्वसंरक्षणार्थ प्रशिक्षण | २,००,००० |
| ८. | संशोधनात्मक काम करणा-या विद्यापीठीय शिक्षकांना पुरस्कार | ५,००,००० |
| ९. | नाविन्यपूर्ण उपक्रम आणि बुध्दी संपदा हक्क | २,००,००० |
| १०. | महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचा-यांना पुरस्कार | १०,००,००० |
| ११. | न्यायमुर्ती काशिनाथ त्रिंबक तेलंग विशेष व्याख्यानमाला | २,००,००० |
| | | ३,००,००० |

वरील तरतुदी मधुन पुस्तके व मालमत्ता यांचे नियोजन व सुरक्षितता सुलभ होण्याची अपेक्षा आहे.

## निधीमध्ये अंशदान

अर्थसंकल्पामध्ये १२.१२ कोटी रुपये इतक्या रक्कमेचे अंशदान विविध प्रकारच्या निधीमध्ये केलेले आहे. यामध्ये विकास निधी, घसारा निधी, आकस्मिकता निधी, कर्मचारी घर बांधणी निधी, सींकींग निधी, कुलगुरू निधी, निवृत्ती वेतन निधी आणि इतर निधी यांचा समावेश आहे.

या विवेचना नंतर मी या अर्थसंकल्पीय भाषणाचा समारोप करीत आहे. मात्र हा समारोप करण्यापूर्वी वर्ष २०१३-२०१४ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक आपल्या समोर मांडण्याची संधी दिल्याबद्दल मी विद्यापीठाचे सन्माननीय कुलगुरू, व्यवस्थापन परिषद आणि वित्त व लेखा समितीचे सन्माननीय सदस्य यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करतो.

अर्थसंकल्प तयार करण्यासाठी घेतलेल्या सक्रीय सहभागाबद्दल आणि मौलिक मार्गदर्शनाबद्दल मी अंदाजपत्रक परिक्षण समितीचे आभार मानतो. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या प्रशासन विभागातील कर्मचारी, विद्यापीठाच्या विविध परिसरातील वित्त व लेखा विभागातील कर्मचारी आणि विद्यापीठ मुद्रणालयातील कर्मचारी यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे मी आभार मानतो.

आता मी २०१३-२०१४ चा अर्थसंकल्प या महनीय सभागृहापुढे विचारार्थ, स्वीकृतीसाठी आणि मंजुरीसाठी सादर करीत आहे.